


दैनिक **दिव्य मातृछाया** बुलडाणा

मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६

महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र

● वर्ष : पाचवे ● अंक : २९४ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711 | www.matruchhaya.in | ● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555


# यंदा कमी पाऊस

## प्रशांत महासागरात 'एल निनो'च्या सक्रियतेचा फटका

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**मुंबई :** पश्चिम आशियातील युद्धझळांमुळे जगभरात चिंतेचे वातावरण आहे. त्यात आता पावसाच्या अंदाजाने भर घातली. या वर्षी प्रशांत महासागरात 'एल निनो'ची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असून यामुळे देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

हवामान बदलाचा सामना करणार्या नागरिकांच्या समस्यांमध्ये आणखीन वाढ होण्याची शक्यता आहे. या वर्षीच्या हंगामात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तविला आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागातर्फे (आयएमडी) मोसमी पावसाचा पहिला दीर्घकालीन अंदाज सोमवारी जाहीर करण्यात आला आहे. यात राज्यात यंदा सरासरीहून कमी पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.हवामान विभाग एप्रिलच्या मध्यात मोसमी पावसाचा पहिला अंदाज आणि मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुधारित अंदाज जाहीर करतो.

अंदाजानुसार, देशात यंदाच्या मान्सूनच्या हंगामात दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी म्हणजे सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

यामुळे या वर्षीच्या हंगामात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता ६६ टक्के इतकी आहे.



### आर्थिक संकटाची वर्दी

♦ पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे, २०२६-२७ या आर्थिक वर्षात देशातील विकास दर वाढीला खीळ बसण्याची शक्यता 'इक्रा' या पतमानांकन संस्थेच्या मुख्य अर्थतज्ज्ञ अदिती नायर यांनी व्यक्त केली. या आर्थिक वर्षात देशाची अर्थव्यवस्था ६.८ टक्के ते ७.२ टक्क्यांदरम्यान वाढेल, असा सरकारचा अंदाज आहे. मात्र त्यात पुरेसा पाऊस झाला नाही तर महागाई वाढण्याचा धोका आहे.

### अकोल्यात सर्वाधिक तापमान

♦ विदर्भातील कमाल तापमानात वेगाने वाढ होत आहे. अकोल्यात देशातील सर्वाधिक ४३.८ अंश सेल्सिअस तापमानाची सोमवारी नोंद झाली. अकोल्यासह विदर्भातील चार शहरांत तापमान ४३ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक होते. अमरावती आणि यवतमाळ येथे ४३.२ तर वर्धा येथे ४३.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद सोमवारी झाली.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाबाबत निवेदनास मुदतवाढ

● दिव्य मातृछाया ● वृत्त संकलन

**मुंबई :** राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे अ, ब, क, ड या धर्तीवर उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने निवेदन किंवा अर्ज सादर करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली सोमवारी दिली.

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यासंदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.











# गुरुजींना अशैक्षणिक कामांचे ओझे

## शासनाने शिक्षकांच्या माथी मारलेल्या अशैक्षणीक कामांमुळे ऊडाली झोप

- **दिव्य मातृछाया**
- **फुलचंद भगत**

**वाशिम :** अध्यापन कार्यासाठी शिक्षकांची नेमणूक केली जाते; परंतु काही वर्षांत संपूर्ण चित्रच बदलले आहे. शिक्षणाव्यतिरिक्त कामाच्या दडपणात जिल्हा परिषदेचे शिक्षक दबले गेल्याचे वास्तव समोर आले आहे.मंगरुळपीर तालुक्यात ११७ जि.प.च्या शाळा,४५ खाजगी अनुदानित,२२ स्वयंअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या आणी ३ समाजकल्याण व आश्रमशाळा आहेत.यामध्ये शिक्षकांची ही स्थिती चिंतेत भर घालणारी आहे.

अशैक्षणिक कामांमुळे शिक्षक सतत गुंतलेले आणि काळजीत गुरफटलेले आढळतात. विशेषतः जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांचे अध्यापनेतर कामांमुळे मोठे हाल सुरू आहेत. जिल्हा परिषदेच्या बहुतांश शाळा खेड्यापाड्यांत आहेत. तेथील जास्त शिक्षक अशैक्षणिक कामांनीच बेजार असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिकवायचे तरी कधी, असा त्यांचा सवाल आहे. यापूर्वी शिक्षकांनी याबाबत मोर्चेही काढले. मात्र प्रशासन केवळ 'वरूनच तसा आदेश आहे, यात आम्ही काही करू शकत नाही,' एवढे सांगून हात वर करीत आहे.




गत काही वर्षांत शिक्षकांच्या ऑनलाईन कामांत वाढ चालली आहे. मूलभूत सोयी-सुविधा न पुरवता, भौगोलिक स्थिती लक्षात न घेता शिक्षकांच्या माथी बसविलेल्या या कामांनी शिक्षकांची झोप उडवलीय.

सरल पोर्टल सुरू झाले आणि ऑनलाईन कामांचे प्रमाणही वाढले. सर्व्हर अनेकदा डाऊन असतो.

स्कूल पोर्टल, स्टुडंट पोर्टल, टीचर्स पोर्टल, शालेय पोषण आहार पोर्टल, शाळासिद्धी, स्वच्छ विद्यालय माहिती, दहाहून अधिक शिष्यवृत्त्यांची माहिती, यूडायस डेटा, गणवेश, प्रशिक्षणासाठी गुगल फॉर्मच्या लिंक्स भरणे, शालार्थ संगणक प्रणालीत पगार बिले तयार करणे, वृक्षारोपण, वाचन दिवस, फुटबॉल खेळ यांसारख्या वेगवेगळ्या दिवसांचे अहवाल देणे अशी अनेक कामे शिक्षकांवर येऊन पडल्याचे दिसत आहे.

### निवडणूक कामात व्यस्तता अधिक

- शिक्षक निवडणुकीच्या कामात तर अधिकच व्यस्त दिसतात. ग्रामपंचायतींच्या निवडणुका, त्यापूर्वी विधानसभेच्या निवडणुकांमध्ये शेकडो शिक्षकांची ड्यूटी लावण्यात आली होती. कोरोनाकाळात शिक्षकांना अक्षरश: कन्टेन्मेंट झोनमध्ये सर्वेक्षणाचे काम देण्यात आले होते. अनेक ठिकाणी परगावांतील नागरिकांच्या नोंदी घेण्यात सांगण्यात आले.
- याशिवाय मतदार याद्या अद्ययावत करणे, त्यासाठी लोकांना माहिती देणे, गावातील लोक शौचालयाचा वापर करतात की नाही, याची माहिती घेणे, महसूल यंत्रणेसोबत निवडणुकीसाठी बूथ लेव्हल ऑफिसर म्हणून काम करणे, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करणे, शाळेत दररोज शिजणाऱ्या पोषण आहारावर नजर ठेवणे, प्रत्येक विद्यार्थ्याची माहिती एमडीएम पोर्टलवर नियमितपणे भरणे, आदी कामांचाही ताण असतोच. शाळा सुरू असताना या कामांचा अध्यापनाला त्रास होतो.
- एक किंवा दोन शिक्षकी शाळांची तर मोठी अडचण निर्माण होते. दरवेळी शिक्षकांना भरपूर अशैक्षणिक कामे दिली जातात. त्यामुळे अनेकजण त्रस्त असतात. प्रशासनाने काही कामे सोपविली, ती कामे शिक्षकांनी इमानेइतबारे केली आहेत.

### दोन शिक्षकी शाळांचे प्रचंड हाल

- जिल्हा परिषदेच्या काही शाळांमध्ये मुख्याध्यापकाचे पदच मंजूर नाही. त्यामुळे अध्यापनासह इतर प्रशासकीय कारभार, अशैक्षणिक कामांचा भार शिक्षकांवर आहे. अनेकदा या कामात शिक्षकांना स्वत: खर्च करावा लागत असल्याचेही चित्र आहे.
- त्यात गावात इंटरनेटची रेंज नसली तर रात्री जागून मोबाईलवर ती माहिती भरणे, आदी कामांमुळे शिक्षक कायम तणावात राहत असल्याचेही दिसून येते. ज्या शाळा दोन शिक्षकी आहेत येथे अशैक्षणिक कामे आल्यास अध्यापनाचे काम पूर्णपणे एकाच शिक्षकाच्या खांद्यावर येते.







# पालकांकडून चिंता : अल्पवयीन मुली पळून जाण्याचे प्रमाण वाढले

## मैत्रीकडुन तकलादु आणी दिखावु प्रेमसंबधापर्यतचा प्रवास ; शालेय स्तरावर प्रबोधनाची गरज

- **दिव्य मातृछाया**
- **फुलचंद भगत**

**वाशिम :** टीव्ही, मोबाईल, सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे १६ ते १७ वयोगटातील अल्पवयीन मुली घर सोडून प्रियकरासोबत पळून जाण्याचे प्रमाण वाढले आहे.तशी अल्पवयीन मुलींनी घर सोडल्याची पोलीस दप्तरी नोंद आहे.तालुक्यांत मुलींचे घर सोडून निघून जाण्याचे प्रमाण घाबरवून टाकणारे आहे. ही चिंतेची बाब लक्षात घेऊन पोलिस आणी सबंधित प्रशासनाने शालेय स्तरावर मुला-मुलींमध्ये प्रबोधन करण्यासाठी नगरपरिषद, जिल्हा परिषद, महिला दक्षता विभाग, बालकल्याण समिती यांच्यावतीने मोहीम राबविण्याची मागणी होत आहे.

पंधरा-सोळा वर्षे हाताखांद्यावर खेळवले, वाढविले त्या आई-वडिलांपेक्षा त्यांना समोरचा प्रियकर महत्त्वाचा वाटू लागतो. आणि त्यातूनच त्या पळून जातात. काम आणि कमाईच्या चक्रात अडकलेले आई-वडील मुलींनी दिलेल्या या अनपेक्षित धक्क्याने कोलमडून जात असल्याचे चित्र आहे. आई-वडील




- अल्पवयीन मुली पळून जाण्याची पालक आणी पोलिस विभागातही चिंता व्यक्त होत असुन शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याने तालुका आणी जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत मुला-मुलींना प्रबोधनाचे धडे दिले जाणे गरजेचे आहे.
- बहुतांशी लोक नोकरीनिमित्त बाहेरगावी आहेत. त्यांचे कुटुंब मात्र गावातच आहे. आई कामासाठी बाहेर पडल्यानंतर अंकुश ठेवणारी जबाबदार व्यक्तीच घरी नसल्याने अल्पवयीन मुली निरनिराळ्या आमिषांना बळी पडत आहेत.
- आधी मैत्री, मग गप्पाटप्पा आणि मग भेटवस्तू. घरामध्ये न मिळणाऱ्या वस्तू प्रियकराकडून मिळू लागल्याने त्या भारावून जातात. मोबाईल अनेक मुलींना पुरविला जात आहे.
- हा प्रवास मैत्रीकडून तकलादू आणि दिखाऊ प्रेमसंबंधांपर्यंत जातो. त्यामुळे घरच्या बंधनातून बाहेर पडून स्वतःच्या स्वप्नातील संसार उभा करण्याचे स्वप्न या मुलींना पडते.

पोलिसांत दाद मागतात. परंतु अब्रूचे खोबरे होणे आणि मनःस्ताप पदरी पडणे ते रोखू शकत नाहीत. अल्पवयीन मुलगी असल्याने पोलीस अपहरणाचा गुन्हा दाखल करतात. शोध घेतल्यानंतर मात्र मुलगीच स्वतःहून पळून गेल्याचे सांगते. हा पळून जाण्याचा ट्रेंड कोठेतरी थांबला पाहिजे. त्यासाठी शालेय स्तरावर मुला-मुलींच्यात प्रबोधन करण्याचा निर्णय पोलीस प्रशासनाने घेणे आवश्यक आहे.

पळून गेलेल्या मुलींच्या आयुष्यासह कुटुंबाचेही आयुष्य बरबाद होत असल्याची विदारक वस्तुस्थिती आहे. मुलीचे अपहरण झाल्याची नोंद पोलीसदप्तरी झाल्यानंतर मुलगी अल्पवयीन असल्याने तिने घरातून पळून जाऊन केलेला विवाह बेकायदेशीर ठरतो. त्यामुळे मुलीची रवानगी सुधारगृहात आणि मुलावर कायदेशीर कारवाई होते.

यात दोन्हीकडच्या कुटुंबांना प्रचंड मनःस्ताप भोगावा लागतो. बहूतांश वेळी पळुन जाणारे मुलंमुली बालीक असतात आणी आधिच ते लग्नबंधनात अडकुन पडतात व पळुन गेल्याचे लक्षात आल्यावर आधीच लग्नही केले असल्याचे निदर्शनात येते.विशेष म्हणजे केवळ मुली हरवल्या एवढ्यावरच ही समस्या संपणारी नाही.

अल्पवयीन मुली लग्नाच्या आमिषाने पळून जाण्याचे प्रमाण वाढते आहे. या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन शालेय स्तरावर मुला-मुलींमध्ये प्रबोधन व समुपदेशन करण्याचा निर्णय प्रशासनाने घ्यावा ही मागणी जोर धरत आहे.

# होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांचा जयंती साजरी

- **दिव्य मातृछाया**
- **राहुल सरदार**

**लोणार :** होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांचा २७१ वा जयंती सोहळा दहा एप्रिल 2026 रोजी साजरा करण्यात आला. या जयंती सोहळ्याचे आयोजन डॉ आर एन लाहोटी होमिओपॅथी मेडिकल कॉलेज सेमिनार हॉल सुलतानपूर येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ आर एन लाहोटी होमिओपॅथी मेडिकल कॉलेज सुलतानपूर विद्यार्थी यांनी केले होते. कार्यक्रमाची जबाबदारी भक्ती जानराव, आस्था बागडे व प्रतीक कुमठे यांच्यावर होती.



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अतुल पडघान प्रशासक, प्राचार्य डॉ शिवाजी चव्हाण ,डॉ संतोष आडे, डॉ कविता चौधरी, डॉ अनुराधा साहू, डॉ ऋतू आडे, नंदिनी पिसे, डॉ संदीप बोरे, डॉ नयन सुराणा, सागर जोशी व होमिओपॅथिक कॉलेजचे विद्यार्थी उपस्थिती होते.

यावेळी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे जसे की पोस्टर प्रेसेंटेशन, भाषण, रॅपिड फायर व होमोओपॅथी बद्दल असलेले समज व गैरसमज या बद्दल डॉ कविता चौधरी याची मुलाखत घेण्यात आली. शेवटी कैलास डोईफोडे यांनी आभार मानले.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिटिंग प्रेस तहसील कायार्लयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिववाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# सिं.राजा शहर विकास कामांना विरोध; राजकारणाचा वास - नगराध्यक्ष सौरभ तायडे

- दिव्य मातृछाया
- रवि ढवळे

**सिंदखेडराजा दि.13 :** शहरातील गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विकासकामांना आता गती मिळू लागली असताना काही जणांकडून जाणीवपूर्वक विरोध केला जात असून या विरोधामागे राजकारणाचा वास येत असल्याचा आरोप लोकनियुक्त नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनी केला आहे. त्यांनी माध्यमांशी बोलताना दिलेल्या बाईटमध्ये स्पष्ट केले की, शहरातील पाणीपुरवठा योजना, रस्ते कामे तसेच इतर मूलभूत सुविधा उभारणीसाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली आहेत.



♦ तब्बल १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या योजना आता प्रत्यक्षात येऊ लागल्या असून नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे. मात्र काही व्यक्ती स्वार्थासाठी आणि प्रसिद्धीसाठी या कामांमध्ये अडथळे निर्माण करत आहेत.

♦ ठेकेदारांवर दबाव टाकणे, खोट्या तक्रारी करणे आणि कामे थांबवण्याचा प्रयत्न करणे अशा प्रकारांनी विकास प्रक्रियेला अडथळा आणला जात आहे.

♦ संबंधित सर्व कामे अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आणि नियमांनुसार सुरू असून त्यात कोणताही गैरप्रकार होत नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

♦ विरोध करणे हा लोकशाहीचा अधिकार असला तरी विकासकामांना अडथळा निर्माण करणे योग्य नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ही कामे अत्यंत आवश्यक असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले. काही जण स्वतःच्या स्वार्थासाठी आणि राजकीय हेतू साध्य करण्यासाठी वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत असून या कामांना नागरिकांचा पाठिंबा मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विकासकामांमध्ये पारदर्शकता राखली जात असून प्रत्येक कामाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी केली जात आहे.

शहराच्या भविष्यासाठी ही कामे महत्त्वाची असून त्यामध्ये अडथळे निर्माण करणे म्हणजे शहराच्या प्रगतीला रोखण्यासारखे असल्याचेही त्यांनी सांगितले. विरोधकांनी सकारात्मक भूमिका घेत शहराच्या विकासात सहकार्य करावे, अन्यथा जनतेतून तीव्र प्रतिक्रिया उमटेल, असा इशाराही त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेस नगरसेवक कृष्णा मेहेत्रे, संदीप मेहेत्रे, दिलीप आढाव, जनसेवक योगेश मस्के, डॉ मंगेश बारवकर ओम भुसारे, गणेश झोरे, दीपक ठाकरे सर आदी उपस्थित होते.

# सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महिलांना साडी वाटप




- दिव्य मातृछाया
- मो.नवाज कुरेशी

**जाफराबाद :** येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून जाफराबाद येथील सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत जाफराबाद तालुक्यातील माहोरा, कोल्हापूर,चापनेर, येवता, डोलखेडा, आरतखेडा, सावंगी, गोंधनखेडा, टेंभूर्णी, आडा भारज व परिसरातील विधवा, परित्यक्ता व गरजू महिलांना १३५ साड्या वाटप करुन सन्मान करण्यात आला.

♦ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर महिलांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या सन्मानासाठी लढा दिला, त्यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम आयोजित केला असल्याचे दादासाहेब म्हस्के यांनी सांगितले.

♦ साडी वाटपाचा लाभ घेताना महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. "शिक्षण आणि संघटन यासोबतच सामाजिक मदतीचा हात पुढे करणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे," असे मत महाविद्यालय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राहुल भाऊ म्हस्के यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा अनिल वैद्य यांनी केले. तर आभार प्रा. डॉ.मनोज पगारे यांनी मानले.

या विशेष कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षण महर्षी तथा सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक /अध्यक्ष दादासाहेब म्हस्के हे होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुलजी म्हस्के हे होते. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिद्धार्थ महाविद्यालयाने राबवलेल्या या प्रेरणादायी उपक्रमाचे जाफराबाद परिसरातून मोठे कौतुक होत आहे.

# लोणार येथे भाजपाचा स्थापना दिवस उत्साहात साजरा



- दिव्य मातृछाया
- राहुल सरदार

**लोणार :** भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस 6 एप्रिल 2026लोणार येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच चिखली विधानसभेच्या कर्तव्यदक्ष आमदार श्वेता ताई महाले पाटील यांच्या नेतृत्वात आणि भाजपा बुलढाणा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पार पडला.

♦ यावेळी शहराध्यक्ष शुभम बनमेरू यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पार्टीचा राष्ट्रीय ध्वज फडकवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच शहरातील विविध ठिकाणी व कार्यकर्त्यांच्या घरीही भारतीय जनता पार्टीचा राष्ट्रीय ध्वज फडकवत स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.


♦ नगरसेविका सौ. शोभाताई भागवतराव देसाई तसेच शुभम देसाई (जिल्हा महामंत्री, युवा मोर्चा, बुलढाणा व स्थापना दिन मंडळ संयोजक) यांच्या निवासस्थानीही कार्यक्रम उत्साहात पार पडला. तसेच नगरसेविका सौ. पायल ताई शुभम भगत व भाजपा तालुका सरचिटणीस प्रमोद भाऊ वराडे यांच्या निवासस्थानीही भारतीय जनता पार्टीचा राष्ट्रीय ध्वज फडकवून स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी भाजपा स्थापना दिन मंडळ संयोजक शुभम देसाई तथा जिल्हा महामंत्री, युवा मोर्चा, शहराध्यक्ष भाजपा शुभम बनमेरू, तालुका अध्यक्ष भाजपा गजानन मापारी, जिल्हा उपाध्यक्ष भाजपा विजय मापारी, जिल्हा सचिव भाजपा विष्णू डोळे, जिल्हा उपाध्यक्ष युवा मोर्चा सचिन फुलाने, तालुका सरचिटणीस भाजपा प्रमोद भाऊ वराडे, नगरसेविका लोणार भाजपा शोभाताई भागवत देसाई, नगरसेविका भाजपा लोणार पायल ताई शुभम भगत यांच्यासह अजीम चौधरी, पंकज राऊत, पवन खडककर, रोशन मादनकर, आकाश दांडगे, शुभम भगत (युवा नेते), निखिल मुलांगे, शुभम लीलाडे, अर्जुन रामावत, गजानन सरोदे, संदीप आमले, धनराज मादनकर आदींसह असंख्य महिला व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच, भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस लोणार येथे मोठ्या उत्साहात व कार्यकर्त्यांच्या व्यापक सहभागातून साजरा करण्यात आला.

# महापुरुषांची जयंती समाजपयोगी उपक्रमांनी साजरी करा

- दिव्य मातृछाया
- फुलचंद भगत




**वाशिम :** महापुरुषांच्या जयंतीनिमित्य अनिष्ट प्रथांना फाटा देत गरजु गरीबांना मदतीचा हात देवून समाजपयोगी ऊपक्रम राबवायला हवे.

**पोलिस विभागाचे आवाहन**

महापुरुषांची जयंती केवळ मिरवणूक किंवा पूजापुरती मर्यादित न ठेवता, ती रक्तदान, शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण, अन्नदान आणि गरजूंच्या मदतीसारख्या विधायक व समाजपयोगी उपक्रमांनी साजरी करण्याचे आवाहन पोलीस विभागाकडून सर्वांना केले जात आहे.

**महापुरुषांनी आपल्या आयुष्यात दीन-दलितांसाठी व मानवतेसाठी कार्य केले. त्यामुळे त्यांची जयंती साजरी करताना त्या विचारांना अनुसरूनच समाजहिताचे काम करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**

**- ठाणेदार किशोर शेळके,**
पो. स्टे. मंगरुळपीर

अवाजवी खर्च टाळून, महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करणारी सेवाभावी जयंती साजरी केल्यास समाजातील गरजूंना खरा मदतीचा हात मिळेल. शैक्षणिक साहित्याचे वाटप, अनाथालयात अन्नदान, रक्तदान शिबिरे आणि वृक्षारोपणासारखे उपक्रम राबवून जयंती साजरी केली जावी.

महापुरुषांच्या विचारांतील उदात्तता आणि समतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात यावा.

मिरवणुकीवरील अवाजवी खर्च वाचवून तो गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावावा.ग्रामीण भागात शालेय साहित्याचे वाटप करुन अनाथ मुलांसाठी अन्नाची सोय करावी.

# आमदार मनोज कांयदे यांच्या हस्ते मुस्लिम समाज कब्रस्तानाचे भूमिपूजन संपन्न



- दिव्य मातृछाया
- अहेमद कुरेशी

**साखरखेर्डा :** येथे मुस्लिम समाज कब्रस्तान परिसरात नव्याने सभामंडप उभारणीच्या कामाचा भूमिपूजन सोहळा आमदार मनोज कायंदे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मनोज नंदाताई देवानंद कायंदे (आमदार, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते करण्यात आले. या कामासाठी आमदार निधीतून १०.०० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड. नाझेर काझी (प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – अल्पसंख्यांक विभाग) होते.तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. इरफान अली शेख (प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र राज्य) उपस्थित होते.

♦ या कामामुळे परिसरातील मुस्लिम समाज बांधवांना नमाज पठन व इतर सामाजिक कार्यक्रमांसाठी सुविधा उपलब्ध झाली आहे, मुस्लिम समाज कब्रस्तान मध्ये पाणी ची टाकी, पाइपलाइन , रस्ते संरक्षण भीत, गार्डन, हाइमर लाइट इत्यादि सर्व सुविधा देण्यासाठी येथील मुस्लिम समाजाचे युवा कार्यकर्ते युनूस शाह, असलम शाह, आसिफ कुरेशी, अशपाक शाह, मन्नान शाह, पत्रकार जुबेर शाह इत्यादिनी गेल्या वर्षी पासून विशेष प्रयत्न केले होते व या साठी दे.राजा येथे मुस्लिम समाज बांधवांची बैठक ही आयोजित करण्यात आली होती त्या बैठकीत सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता.

अँड ,नाझेर काझी,इरफान अली यांनी आमदार मनोज कायंदे यांच्या कड़े विशेष पाठ पुरावा केला होता त्या मुळे येथील मुस्लिम समाज काब्रिस्तना मध्ये जनाजा नमाज पठन करण्यासाठी नवयाने समाज सभागृह मंजूर करण्यात आला आहे.

त्या नंतर इतर विकासाची कामे केली जानार आहे शनिवार ला संपन्न झालेल्या भूमिपूजन सोळयात, साखरखेर्डा नगरीचे माजी सरपंच सुनील जगताप,शेख आसिफ शेख जुसुफ कुरेशी, महोम्मद समिऊल हक,,आबेद खान,शेख राजिक, मुहम्मद अफसर, अन्सार शाह,नईम पठाण, शेख अर्शद, तहेजीब शाह, शारिक शाह, शाहरुख खान, अजीम कुरेशी, व आधी मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनगांव राजात व्यापाऱ्याच्या गोडाऊनवर चोराचा डल्ला

## साडेचार लाखांचा सोयाबीन–हरभरा लंपास

- दिव्य मातृछाया
- अफरोज पठाण

**किनगांव राजा :** येथे अज्ञात चोरट्यांनी व्यापाऱ्याच्या गोडाऊनवर डल्ला मारत सुमारे साडे चार लाख रुपयांचा सोयाबीन व हरभरा लंपास केल्याची घटना घडली आहे. याघटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीच्या वातावरण निर्माण झाले आहे.

### महामार्गावर वाहन उभे करून सोयाबीन हरभरा केला पोबारा

♦ गोडाऊन पश्चिम बाजूला असलेल्या शेताकडच्या बाजूने दोन ठिकाणी तीन पत्राचे नटबोट चोट्यानी खोलून तीनपत्रा मधून सोयाबीन व हरभरा वाहनांमध्ये भरून चोरट्यांनी महामार्गावर उभे केलेल्या वाहनांमध्ये भरून लंपास केला आहे.रात्री १ ते ४ च्या दरम्यान घटना घडली असल्याचे सांगण्यात येत आहे.वाहन नेमक्या कोणत्या दिशेला केले हे शोधण्याचे आवाहन स्थानिक पोलीस विभागासमोर आहे.

सिंदखेड राजा रस्त्यावर असलेल्या 'सोहम ट्रेडर्स' या शेतमाल खरेदी-विक्री दुकानाच्या गोडाऊनमध्ये ही चोरीची घटना उघडकीस आली दि.११ एप्रिलच्या मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गोडाऊनच्या बाजूचे टिन पत्रे वाकून आत प्रवेश केला व मोठ्या प्रमाणावर शेतमाल चोरून नेला आहे.

गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेले सुमारे ४२ क्विंटल सोयाबीन अंदाजे किंमत २ लाख ३१ हजार रुपये तसेच ३८ क्विंटल हरभरा अंदाजे किंमत २ लाख २३ हजार २५० रुपये असा एकूण सुमारे ४ लाख ५८ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. चोरीनंतर सकाळी परिसरातील शेतकऱ्यांनी संबंधित प्रकार हा गोडाऊन मालक शिवाजी जाधव यांना भ्रमणध्वनी वरून दिला होता.



घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस स्टेशनचे पथक, स्थानिक गुन्हे शाखा तसेच फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला होता.घटनास्थळा वरून तांत्रिक माहिती, काही ठसे व पुरावे गोळा करण्यात आले असून त्याच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, वाढत्या चोरीच्या घटनांमुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पोलिसांनी लवकरात लवकर आरोपींना अटक करून चोरीचा मुद्देमाल परत मिळवून देण्याची मागणी व्यापाऱ्यांकडून केली जात आहे.

पोलिसांसमोर चोरट्यांचा शोध लावण्याचे मोठे आव्हान उभे राहिले असून, तपासाची दिशा विविध अंगांनी सुरू असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# अपंग जनतादल सामाजिक संघटनेतर्फे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे साहेब यांचा सत्कार

- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**बुलढाणा :** नवीन रुजू झालेले जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे साहेब यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आजरोजी दि. १३/०४/२०२६ ला त्यांच्या भेटीसाठी अपंग जनतादल संघटनेचे राज्य सचिव कलीम शेख व त्यांचे सहकारी दिव्यांग मित्र गेले असता.



जिल्हाधिकारी साहेबांनी CCTV कॅमेरामध्ये त्यांना बघितल्या क्षणी कॅबिनमध्ये बोलावुन त्यांनी त्यांचे दालन सोडून भेटीला गेलेल्या दिव्यांग यांच्या जवळ येऊन खुर्चीवर बसण्यासाठी आग्रह केला आणि म्हटले आपणास आपला सन्मान मिळणे आवश्यक आहे.


अशाप्रकारे जिल्हाधिकारी साहेबानी खुर्चीवर बसवुन भेटीला गेलेल्या दिव्यांगांना सन्मान दिला. नंतर पुष्पगुच्छ स्वीकार केला आणि चर्चा करते वेळी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे साहेब यांनी कलीम शेख यांना, स्वतःचा संपर्क क्रमांक देऊन म्हटले दिव्यांगांच्या कुठल्याही समस्येसाठी तुम्ही मला संपर्क करू शकता. मी बुलढाणा जिल्ह्यातील दिव्यांग व नागरिकांच्या समस्या सोडविण्याकरिता केव्हाही उपलब्ध राहील.

# शासकीय प्रमाणपत्रांवर आता लाभार्थ्यांचा फोटो व क्यूआर

● दिव्य मातृछाया
● सादीक कुरेशी

**मेहकर :** विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी किंवा शैक्षणिक प्रवेशासाठी लागणाऱ्या दाखल्यांमधील बनावटगिरी आता भूतकाळ ठरणार आहे. महसूल विभागाने तहसीलदार व उपविभागीय अधिकारी कार्यालयांतून दिली जाणारी सर्व प्रमाणपत्रे आता निर्णय घेतला आहे. या नवीन बदलामुळे 'अल्ट्रा हायटेक' स्वरूपात देण्याचा आता प्रत्येक प्रमाणपत्रावर संबंधित लाभार्थ्यांचा फोटो आणि एक 'युनिक क्यूआर कोड' असणार आहे.

अनेकदा बनावट दाखल्यांच्या आधारे सवलती लाटण्याचे प्रकार समोर येतात. कागदपत्रांची पडताळणी करताना ती खरी आहेत की खोटी, हे तपासणे यंत्रणेसाठी कठीण जात असे.मात्र, आता क्यूआर कोडमुळे अवघ्या काही सेकंदात प्रमाणपत्राची सत्यता तपासता येईल. या क्रांतिकारी पावलामुळे मध्यस्थ आणि एजंटांच्या टोळ्यांना चाप बसणार असून, सर्वसामान्य नागरिकांना डिजिटल सुविधेचा मोठा आधार मिळणार आहे.




**गैरप्रकारांना बसणार आळा**

प्रमाणपत्रांचे स्वरूप बदलले. प्रमाणपत्रावर तहसीलदारांची डिजिटल स्वाक्षरी होती.

**या कार्यालयांत 'डिजिटल' प्रणाली कार्यान्वित होणार**

तहसीलदार कार्यालयातून उत्पन्नाचे दाखले, रहिवासी आणि अल्पभूधारक प्रमाणपत्रे देण्यात येतात. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयातून जात प्रमाणपत्रे आणि नॉन-क्रिमिलेअर दाखले दिले जातात. तसेच सेतू व महा-ई-सेवा केंद्रांवरून मिळणारे सर्व ऑनलाइन दाखले आता नवीन स्वरूपात देण्यात येणार आहेत. नवीन प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार असल्याने बनावट प्रमाणपत्राला लगाम लागेल. तसेच बनावट प्रमाणपत्र शोधणे यंत्रणेस शक्य होईल.

### फोटो अन् क्यूआर : दुहेरी सुरक्षा मिळणार

♦ प्रमाणपत्रावर लाभार्थ्यांचा फोटो असल्याने दुसऱ्या व्यक्तीचे प्रमाणपत्र वापरणे आता अशक्य होईल. क्यूआर कोडमध्ये त्या व्यक्तीचे नाव, निर्गमित तारीख आणि वैधता यांसारखा महत्त्वाचा डेटा सुरक्षित असेल

♦ 4 एप्रिल रोजी सरकारने याविषयी निर्णय घेतला आहे. हा निर्णय लागू झालेला असल्याने नव्या स्वरूपात प्रमाणपत्र मिळतील.

### काय आहे नवीन 'स्मार्ट' प्रणाली ?

१) आता प्रमाणपत्र जारी करण्याची प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित असेल. अर्जदाराने अर्जासोबत दिलेला फोटो आपोआप प्रमाणपत्रावर मुद्रित होईल. सोबतच, सिस्टिमद्वारे एक एन्क्रिप्टेड क्यूआर कोड जनरेट केला जाईल. हा कोड त्या विशिष्ट प्रमाणपत्राची 'डिजिटल ओळख' असेल, जी कधीही बदलता येणार नाही.

२) ही प्रणाली राज्याच्या मुख्य माहिती तंत्रज्ञान डेटाबेसशी थेट कनेक्ट आहे. कोणताही क्यूआर कोड स्कॅन केल्यावर तो युजरला थेट सरकारच्या अधिकृत पोर्टलवर घेऊन जाईल, जिथे त्या प्रमाणपत्राची खरी प्रत डिजिटल स्वरूपात पाहता येईल. यामुळे स्थानिक स्तरावर होणारी फेरफार पकडली जाईल.

३) यापूर्वी प्रमाणपत्राच्या सत्यतेसाठी संबंधित कार्यालयात पत्रव्यवहार करावा लागत असे. आता केवळ स्मार्टफोनमधील स्कॅनरचा वापर करून कोणताही अधिकारी किंवा शैक्षणिक संस्था प्रमाणपत्राची सत्यता तपासू शकेल.

### बोगसगिरीचे वाढते जाळे

♦ शासकीय नोकरी किंवा शैक्षणिक सवलती मिळवण्यासाठी बनावट उत्पन्नाचे दाखले किंवा जात प्रमाणपत्रे सादर करण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक ठिकाणी बनावट शिक्के आणि डिजिटल स्वाक्षरीचा गैरवापर करून 'एजंट' नागरिकांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे खऱ्या गरजू लाभार्थ्यांवर अन्याय होत होता.

# सिं.राजा नगरपरिषदेत भ्रष्टाचाराचे आरोप; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा दि.13 एप्रिल :** शहरातील नगरपरिषदेमध्ये सुरू असलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, अनियमितता व निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा गंभीर आरोप विरोधकांनी केला असून यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

रस्ते उकरून ठेवण्यात आल्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन हालचालींना अडथळे निर्माण होत असून निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. 'नागरोत्थान' योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे पूर्णतः अपयशी ठरत असल्याचे नमूद करत स्वच्छता पथदिवे, ब्लिचिंग पावडर यांसारख्या बाबींमध्येही अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी नगरसेवक निलेश ठाकरे, सौ. सारिका मेहेत्रे, हाजरा नुजहत काझी, कैलास म्हस्के, संतोष मेहेत्रे, आबेज खान, श्रीमती जासमिन अजीम तांबोळी, श्रेया खरात यांनी संयुक्तरित्या तक्रार सादर केली असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.




♦ शहरात राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा, गटार योजना तसेच रस्ते बांधकामांमध्ये तांत्रिक निकषांचे उल्लंघन करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेषतः पाईपलाईन टाकताना जॉइंटिंग व प्रेशर टेस्टिंग न करता कामे उरकली जात असल्यामुळे भविष्यात पाणीपुरवठा खंडित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच गटार योजनेच्या कामांमध्ये तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष करून कामे करण्यात आली असून सांडपाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# शेतीसाठी आवश्यक पांदण रस्त्याच्या समस्या निकाली काढा : शैलेष सावजी

## नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ प्रवीणकुमार देवरे यांचे सावजीनी केले स्वागत

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**डोणगांव :** शेतीत राबणारा शेतकरी हाच खरा विठ्ठल असल्याची भावना व्यक्त करत, शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी जिल्हाधिकारी डॉ प्रवीणकुमार देवरे यांच्या कडे केली आहे.

सावजी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी करताना सांगितले की, ज्या पद्धतीने दिवाणी व फौजदारी न्यायालयात वेळेत निकाल देणे अपेक्षित असते, त्याचप्रमाणे महसूल विभागानेही प्रलंबित प्रकरणे वेळेत निकाली काढण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. तहसील स्तरावर रस्त्यांच्या वादांबाबत निर्णय घेण्यात होत असलेला विलंब हा शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक ठरत आहे.

त्यामुळे शेतरस्त्यांशी संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणांची तातडीने दखल घेऊन ते निकाली काढावेत, तसेच विनाकारण विलंब करणाऱ्या संबंधित तहसीलदारांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी यावेळी केली. जिल्हाधिकाऱ्यांनीही या मागणीची दखल घेत संबंधित यंत्रणेला योग्य त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले.



♦ दि 13 एप्रिल रोजी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांची भेट घेऊन शैलेश सावजी यांनी त्यांना विठ्ठलाची मूर्ती भेट दिली. यामागील उद्देश म्हणजे शेतीत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला विठ्ठल मानून त्याच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात, त्यांनी विशेषतः शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत जाणाऱ्या रस्त्यांच्या समस्येकडे लक्ष वेधले. अनेक ठिकाणी शेतरस्त्यांबाबत वाद निर्माण झाले असून, हे प्रकरण तहसील कार्यालयात दीर्घकाळ प्रलंबित आहेत. परिणामी शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यास मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामुळे शेतीच्या कामांवरही विपरीत परिणाम होत आहे.

# बारदाणा नसल्याने शासकीय खरेदी केंद्र बंद

## शेतकऱ्यांना सरकार वाऱ्यावर सोडत आहे–जालिंदर बुधवत

● दिव्य मातृछाया
● वृत्तसंकलन

**बुलढाणा :** राज्यातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्याचा सरकारचा प्रयत्न चालला आहे. बारदाणा नसल्याचे कारण सांगण्यात येत असून हमीभावाने खरेदी केंद्र बंद करण्यात आली. हा व्यापाऱ्यांचे हीत जपण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांकडील बारदाण्यामध्ये शेतमाल खरेदी करावा, अशी मागणी उबाठा शिवसेना च्यावतीने जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांच्या नेतृत्वात करण्यात आली असून आज सोमवार १३ एप्रिल रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांचा शेतमाल घरात पडून असताना बारदाण्याचे कारण सांगून शासकीय हमीभाव केंद्र सध्या बंद आहेत. दीड दोन महिना भरापूर्वी शेतकऱ्यांच्या घरातला शेवटचा दाणा खरेदी होईपर्यंत हमीभाव केंद्र सुरू ठेवण्याची मागणी शिवसेनेने केली होती. आता बारदाणा नसल्याचे कारण सांगून पुन्हा खरेदी केंद्र बंद करण्यात आली आहेत.

जिल्ह्यात जवळपास ४० खरेदी केंद्र सुमारे महिनाभरापासून बंद असल्याची समोर आल्याचा आरोप निवेदनात करीत शेतकरी हिताचा विचार न करता यातही व्यापारी हीत जपण्याचा हा प्रकार असून याबाबत तीव्र निषेध शिवसेनेच्या वतीने व्यक्त केला. शेतकऱ्यांना बारदाणा नसल्याचे कारण सांगत त्यामुळे खरेदी केंद्र बंद ठेवून शेती उत्पादन कमी भावाने व्यापाऱ्यांना विकण्यासाठी प्रवृत्त करणे आणि त्यानंतर मग तोच व्यापाऱ्यांकडील शेतमाल संगणमताने विविध शेतकऱ्यांच्या नावाने नाफेडला विकणे आणि त्यातून व्यापाऱ्यांनी पैसा कमावणे अशा प्रकारचे एक रॅकेट यात सक्रिय असल्याचे उघडपणे सांगण्यात येते. याबाबत देखील राज्य सरकारने कठोर पावले उचलण्याची मागणी केली आहे.

अन्यथा जालिंदर बुधवत यांच्या नेतृत्वात आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी शिवसेना प्रवक्त्या ॲड. जयश्रीताई शेळके, नंदू कन्हाडे, विजय इंगळे, रवी राजपूत, गोविंद डांगर, मोहित राजपूत, अनिल राणा, गजानन धांडे, सुधाकर मुंढे, मिलिंद गवई, सुरेखाताई तायडे, रत्नाताई शेळके उपस्थित होते.



### अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन : जयश्री शेळके

♦ शेतकऱ्यांच्या घरात उत्पादन पडून असताना केवळ बारादाणा नाही, असे सांगून खरेदी बंद ठेवल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा गंभीर इशारा शिवसेना राज्य प्रवक्ता अँड. जयश्रीताई शेळके यांनी माध्यमांशी बोलतांना दिला

# चिखली-बुलढाणा येथे खरीप पूर्व नियोजन सभा संपन्न

## कृषी विभागाच्या त्रुटींवर आ . सौ . श्वेता महाले पाटील यांचा रोष ; अधिकाऱ्यांना कडक ताकीद

● दिव्य मातृछाया
● महेंद्र हिवाळे

**चिखली :** चिखली व बुलढाणा येथे तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठका पार पडल्या. चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी बैठकीत कृषी विभागाच्या कामकाजातील उणिवांवर स्पष्ट व परखड भाष्य करत संबंधित अधिकाऱ्यांना कडक शब्दांत ताकीद दिली.

शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेषतः महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड, कोड जनरेशन, मस्टर प्रक्रिया व शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्यात आलेल्या विलंबाबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले. यंदा या बाबतीत सुधारणा न झाल्यास स्वतः लक्ष घालून कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

पीककर्जापासून वंचित राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी बँका व सहकार विभागाला जाब विचारला. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते, बियाणे व कृषी कर्ज वेळेत उपलब्ध होण्यासाठी कृषी, सहकार, महसूल व कृषी केंद्रांमध्ये समन्वय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

जलसंधारणाच्या कामांकडे लक्ष वेधत सिमेंट नाला बांध, माती नाला बांध व पाझर तलाव यांसारख्या प्रलंबित कामांची दुरुस्ती पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. येणाऱ्या खरीप हंगामात ७३ हजार हेक्टरवर सोयाबीन पेरणीचे नियोजन असले तरी शेतकऱ्यांनी इतर पिकांकडेही वळावे, असे आवाहन त्यांनी केले.

फलोत्पादन क्षेत्र वाढीसाठी विविध योजनांचा प्रभावी वापर करावा व जनजागृती वाढवावी, असे निर्देश देण्यात आले. तसेच मागील वर्षी हुमणी अळीमुळे झालेले नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाने वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले.

कापूस उत्पादन वाढीसाठी कापूस पीक परिसंवाद कार्यशाळा आयोजित करण्याची घोषणा करण्यात आली. तसेच महाविस्तार A.I. ॲपचा वापर व AGRISTACK नोंदणी वाढवण्यावरही त्यांनी भर दिला.

बुलढाणा येथेही आमदार संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र खरीप पूर्व आढावा बैठक पार पडली. दोन्ही बैठकींना विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### कृषी विभागाच्या दोषींवर आमदारांचे प्रखळ भाष्य

♦ रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीच्या प्रक्रियेत गंभीर त्रुटी आढळल्या असून कोड जनरेशन व मस्टर काढण्यात मोठा विलंब झाल्याची नोंद घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्यात झालेल्या उशिरामुळे त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले.

♦ पीककर्जापासून अनेक शेतकरी वंचित राहिल्याने बँका व संबंधित विभागांना जाब विचारण्यात आला. विविध विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

♦ यंदा या त्रुटींमध्ये सुधारणा न झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा आमदारांनी दिला.